# 'आप' हे भाजपाचे पिल्लू तर नव्हे?

**संपादकीय**

**सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**

**सादर करीत आहेत**

आम आदमी पार्टीने देशभरातील सामान्य माणसाला जागृत केले आहे. काँग्रेस आघाडी आणि भाजपा आघाडी यांच्या भ्रष्ट, नाकर्त्या राजकारणाविरुद्ध आपण दंड ठोकले अशी 'आप'ची प्रतिमा निर्माण झाली आहे. पण 'आप'चा उदय, यश आणि प्रवास याचा अभ्यास केला तर 'आप'चा जन्म जरी भ्रष्टाचाराच्या विरुद्ध भूमिकेतून झाला असला तरी 'आप' हे भाजपाने कडेवर घेतलेले पिल्लू आहे की काय असा संशय येऊ लागला आहे.

आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल असो कुमार विश्वास असो नाहीतर सिसोदिया असो, या सर्व नेत्यांनी जाहीर सभांतून काँग्रेस पक्षावरच निशाणा साधला आहे. काँग्रेसचे गांधी घराणे यावर प्रत्येक भाषणांत जबरदस्त टीकास्त्र सोडताना नरेंद्र मोदी यांच्यावर असलेल्या गुजरात दंगलीच्या गंभीर आरोपांबाबत 'आप'चे नेते अधिक बोलत नाहीत. किंबहुना आपच्या नेत्यांचे ९९ टक्के भाषण हे काँग्रेसविरोधी असते आणि शेवटचा १ टक्का अगदी बोलल्यासारखे दिसले पाहिजे म्हणून भाजपाच्या विरोधात एखादे वाक्य बोलले जाते. जितका प्रखर हल्ला काँग्रेसवर होतो तितकाच प्रखर हल्ला भाजपावर होत नाही. नरेंद्र मोदी यांचेही भाषण काँग्रेसवरच असते. 'आप'ने दिल्लीत सत्ता घेतली तरी मोदी 'आप'वर एका वाक्यापेक्षा जास्त बोलत नाहीत.

किंबहुना अमेठीतून राहुल गांधी यांच्याविरुद्ध 'आप'ने आपला उत्तम उमेदवार कुमार विश्वास यांना उभे केले. कुमार विश्वास यांचा अमेठीत प्रचारही सुरू झाला. जर काँग्रेसचा 'पंतप्रधान' उमेदवार राहुल गांधी यांच्या विरोधात 'आप' कुमार विश्वासला उभे करून सर्व शक्ती एकवटते आहे तर भाजपा 'पंतप्रधान' उमेदवार नरेंद्र मोदी यांच्या विरुद्ध 'आप'ने अद्यापही तसाच खंदा उमेदवार जाहीर का केला नाही?

भाजपाला 'आप'चा भरभरून फायदा होत आहे. भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मतदार हे ठरलेले असतात. हे मतदार काहीही झाले तरी त्यांची साथ सोडत नाहीत. दिल्लीची निवडणूक बघितली तर 'आप'ने भाजपाचे हे मतदार त्यांच्याकडे वळविलेच नाहीत. भाजपाचे मतदार आपल्याकडे वळावे यासाठी निवडणुकीतील भाषणांपासून कोणतीच रणनीती 'आप'ने आखली नाही. याउलट 'आप'ने काँग्रेसची गरिबीविरोधी धोरणे, भ्रष्टाचार याविरुद्ध तुफानी हल्ला चढवून काँग्रेसचा पारंपरिक मतदार 'आप'कडे वळविला. काँग्रेसला पारंपारिकपणे मतदान करणारे झोपडीवासी, मुस्लीम, दलित, गरीब हे मतदार भाजपाला कधीही फोडता आले नसते. भाजपाने काँग्रेसवर कितीही झोड उठविली तरी ही पारंपरिक मते भाजपाकडे वळत नाहीत. हे मतदार काँग्रेसलाही कंटाळले, तरी ते भाजपाला मत द्यायला तयार नसतात. या मतदारांना काँग्रेसपासून फोडण्यासाठी 'आप' हे उत्तम हत्यार होते. भाजपाने आपली मते राखली आणि काँग्रेसची मते 'आप'ने फोडली. यात भाजपाचा विजय झाला. दिल्लीत भाजपा सर्वात मोठा पक्ष झाला.

'आप'चा उपयोग लक्षात घेऊनच भाजपाने सुरुवातीपासून 'आप'ला कडेवर घेऊन मोठे करण्यास सुरुवात केली आहे. दिल्लीत जे झाले तेच आता लोकसभा निवडणुकीत देशभर होणार आहे. नरेंद्र मोदींमुळे जीवदान मिळालेला भाजपा पक्ष आपली मते सुखरुप राखेल. पण मोदींच्या आगमनानंतरही काँग्रेसचा जो मतदार तोडणे भाजपाला शक्य नव्हते तो मतदार 'आप'मुळे काँग्रेसपासून दूर जाईल. काँग्रेस पराभूत होईल आणि भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरेल. 'आप'च्या मदतीने हे सर्व साकार होणार आहे.

आम आदमी पार्टीचे नेते नरेंद्र मोदींच्या विरोधात राळ उठवत नाहीत. आडवाणींबद्दल अवाक्षर बोलत नाहीत. भाजपाच्या निर्णयांची टीका करीत नाहीत. मोदींच्या गुजरातवर लक्ष केंद्रित करीत नाहीत. किंबहुना दिल्लीत भाजपाचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार हर्षवर्धन यांचे केजरीवाल यांनी जाहीरपणे तोंडभरून कौतुक केले. महाराष्ट्रातही हेच चित्र बघावे लागणार आहे का? काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे मातब्बर उमेदवार असतील तिथे 'आप'चे बडे नेते निवडणूक लढवतील. समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षातील लढवय्ये नेते जे कधीही काँग्रेस वा भाजपात गेले नसते त्यांना 'आप'मध्ये खेचून काँग्रेस विरोधात लढविले जाईल. भाजपाच्या मतदारसंघात 'आप'चे कच्चे उमेदवार उभे राहतील आणि हे उमेदवार काँग्रेसची मते खाऊन भाजपाचा मार्ग सुकर करतील. एकूण चित्र हेच दर्शवत आहे.

'जंतरमंतर'वर पहिले आंदोलन झाले त्याचा पूर्ण लगाम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हातात होता. तिथूनच संघ आणि भाजपाची ही रणनीती सुरू झाली का?

'काँग्रेस' का हात 'आप'के साथ अशी दिल्लीच्या सत्तेवरून भाजपा नेते टीका करतात. पण प्रत्यक्षात 'आप'चा सर्वाधिक फायदा भाजपालाच होत आहे. 'आप' हे भाजपाचेच पिल्लू असेल तर येत्या काळात ते स्पष्टच होईल. पण आम्ही स्वतंत्र आहोत आणि काँग्रेस आघाडी व भाजपा आघाडी या दोन्हीच्या विरोधात आहोत असे 'आप'चे म्हणणे असेल तर ते त्यांना सिद्ध करावे लागेल.